# पार्किन्सन्स मित्र मेळावा

## पेशंट (शुभार्थी) श्री. केशव महाजन यांचे मनोगत

पार्किन्सन्स, पार्किन्सन्स
त्याने केले जरी आम्हां त्रस्त
तरी पण आमुचा तोच दोस्त ॥धृ॥
जीवन आम्ही जगतो छान मस्त
पार्किन्सन्सची कहाणी तुम्ही ऐकाल
आश्चर्यचकित तुम्ही व्हाल !
जीवन जर त्यांचे जाणाल, तर विचारचक्र सतत फिरेल ॥१॥
पार्किन्सन्स कधी होतो खोडकर, फजितीला नसते मग पारावार
आम्हांला का धरतो धारेवर?
प्रश्न मनी येती वारंवार ॥२॥
कधी-कधी होतो तो छोटे बाळ... तोंडातूनी निघती बोबडे बोल
दुडूदुडू धावती कधी पावलं...कधी चालायचचं नाही म्हणतो हे सोनूलं ॥३॥
पार्किन्सन्स आहे थोडा नटखट
काही वेळा कामे करतो पटपट
रूसला तर कधी होते धावपळ, इतरांची घ्यावी लागते मदत ॥४॥
कधी-कधी होतो हा विसराळू
तसाच तो होतो कधी झोपाळू
पण डॉक्टर आमुचे कृपाळू. ताण नका घेऊ आम्ही सांभाळू ॥५॥
आमुचा आहे एक मदत गट, त्याच्याशी आमुची मैत्री घट्ट
नित्य येतो आम्ही एकत्र, घडवून आणतो चर्चासत्र॥६॥
भेटीचे स्थळ हॉटेल अश्विनी
एकत्र येती सारे आवर्जूनी
समाचार घेती सारे जाणोनी, म्हणून मस्त आम्ही जीवनी॥७॥

रचनाकार - सौ. अंजली केशव महाजन